प्रतिबंधात्मक

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** आजरा **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0061 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/04/2019 00:41 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 04/04/2019

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/04/2019

**Time From (वेळेपासून):** 16:12 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/04/2019 **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/04/2019 00:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आजरा ,आजरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शंकर लक्ष्मण देसाई

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1979 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उंचगी ,आजरा,आजरा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उंचगी ,आजरा,आजरा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8275973029

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | Vilas SHANKARAV Desai | | | 1. गडहिंग्लंज,गडहिंग्लंज,आजरा,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

मी शंकर लक्ष्मण देसाई, वय-40, व्यवसाय- शेती, रा.मु.उचंगी, पो.वाटंगी, ता.आजरा, जि.कोल्हापूर आज रोजी समक्ष आजरा पोलीस ठाणेस हजर राहून फिर्यादी जबाब देतो असा की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबासह रहाणेस आहे. आमची वडीलार्जित शेती आहे. ती मी करतो. त्यावर माझा उदरनिर्वाह चालतो.दिनांक 17/03/2019 रोजी संदेश मारुती कळेकर यांना माझी यांची आई, मावशी, मामी व मामेभाझ सर्व रा.उचंगी, ता.आजरा यांनी पुर्वीच्या भांडणाच्या कारणावरुन मारहाण केली त्याबाबत त्यांचेविरुध्द आजरा पोलीस ठाणे गु.र.नं. 47/2019, भा.द.वि.स. कलम 324, 323, 504, 34 प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. त्याचप्रमाणे माझा मामेभाझ श्री.विक्रम विठ्ठल कळेकर यांना संदेश मारुती कळेकर वगैरे दोन सर्व रा.उचंगी, ता.आजरा यांनी मारहाण केली त्याबाबत त्यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणे, गु.र.नं.46/2019, भा.द.वि.स. कलम 324, 323, 504, 34 प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.माझी आई, मावशी,मामी व मामेभाझ यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयाच्या कामी मला व गुन्हा दाखल असलेल्या सर्वांना आजरा पोलीस ठाणेस हजर राहणेबाबत आजरा पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार विलास देसाई यांनी मला फोनकरुन कळविले होते. त्याप्रमाणे मी दिनांक 02/04/2019 रोजी आजरा पोलीस ठाणेस जावून पोलीस हवालदार विलास देसाई यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला माझी आई, मावशी, मामी व मामेभाझ यांच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाचा तपास मी करत आहे. तुम्हाला गुन्हयाच्या तपासकामी माझेकडून मदत पाहिजे असल्यास, तुम्ही मला 2500/- रुपये द्या, मग मी तुम्हा सर्वांना गुन्हयामध्ये मदत करतो असे संागून 2500/- रुपयांची माझेकडे मागणी केली. त्याबाबत मी दिनांक 04/04/2019 रोजी आजरा पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार विलास देसाई यांचेविरुध्द अन्टी करप्षन ब्युरो कोल्हापूर कार्यालयाकडे तक्रारी अर्ज दिला. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक 04/04/2019 रोजी सापळा कारवाई करणेकरीता पोलीस निरीक्षक मारुती पाटील,अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर यांनी मा.तहसिलदार कार्यालय, कागल व मा.उपअधीक्षक भूमि अभिलेख, कागल यांचे कार्यालयांशी पत्रव्यवहार करुन गोपनीय कामाकरीता पंच मागणी करुन दोन पंच उपलब्ध करुन घेतले आणि त्याचे सोबत आजरा येथील रामतीर्थ धबधब्याकडे जाणारे रोडवर 15.30 वा. च्या सुमारास आले. त्यावेळी पोनि.पाटील यांनी त्यांच्याकडील शासकीय टाटा सुमोमध्ये माझी व सापळा पथकातील कर्मचा-यांची, पंचांची आपापसात ओळख करुन दिली व माझी ओळख करून घेतली. त्यानंतर सोबत हजर असले दोन्ही पंचांना पोनि.पाटील यांनी गोपनिय कामकाजा करीता पंच म्हणून काम करण्यास तयार आहात काय? अषी विचारणा केली असता, त्यास दोन्ही पंचांनी संमती दर्षविली. त्यानंतर पोनि.पाटील यांनी मला माझी तक्रार पंचाचे समक्ष कथन करण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचाचे समक्ष कथन करुन मी दिलेला तक्रारी अर्ज पोनि.पाटील यांनी माझेसमक्ष पंचाना वाचण्यास दिला. तो लेखी तक्रारी अर्ज पंचानी वाचून पाहिला. त्यावेळी मी तोंडी सांगितलेली तक्रार व लेखी दिलेली तक्रार ही एकच असल्याची खात्री केल्यानंतर त्या तक्रारी अर्जावर पोनि.पाटील व पंचानी सह्या केल्या. त्यांनतर पोनि. पाटील यांनी मला माझे तक्रारीचे अनुशंगाने आजरा पोलीस ठाणेस पंच नं.1 भोळे यांचे सोबत माझेकडील होंडा अक्टीव्हा वरुन पाठवुन देवुन

पोलीस हवालदार विलास देसाई हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची प्रथम पडताळणी करणार असलेचे सांगीतले. तसेच मला पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकार्डर चालू-बंद करणेचे प्रात्यक्षिक दाखविले व मला ते समजलेची खात्री केली. त्यानंतर मला व पंच नं. 1 भोळे यांना पडताळणी कारवाईबाबत सुचना देवून मार्गदर्शन केले. त्यानंतर पोनि.पाटील यांनी आपल्या सोबत आणलेला सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून त्यामध्ये नविन मेमरी कार्ड घातले आणि माझे गळयामध्ये डिजीटल व्हाईस रेकार्डर अडकविला व चालु करुन माझेसोबत पंच नं.1 भोळे यांना पोलीस हवालदार विलास देसाई यांची भेट घेण्यासाठी माझे कडील होंडा अक्टीव्हा वरून आजरा पोलीस ठाणेस 16.12 वा. पाठविले. त्या ठिकाणी मी पोलीस हवालदार विलास देसाई यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी माझेशी माझी आई, मामी, मावशी व मामेभावाच्या विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाबाबत चर्चा करुन त्यांनी माझेकडे माझी आई, मावशी, मामी व मामेभाझ यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करतो असे सं◌ागून 2500/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच आजरा पोलीस ठाणेस घेवून येण्यास सांगितलेने मी व पंच नं.1 असे पोनि.पाटील हे ज्या ठिकाणी थं◌ाबले होते. त्या ठिकाणी परत गेलो. त्या ठिकाणी पोनि.पाटील यांनी मला त्याचेकडील टाटा सुमोमध्ये बोलवुन माझे गळयातील डिजीटल व्हाईस रेकार्डर 16.24 वा. बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि.पाटील यांनी मला टाटा सुमोच्या बाहेर थांबणेस सांगुन पंच नं.1 भोळे यांना टाटा सुमो मध्ये बोलविले व त्यांचेकडे विचारपूस केली. त्यानंतर पंच नं. 1 यांचेकडे विचारपूस झालेवर मला परत टाटा सुमो मध्ये बोलवुन माझ्याकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली. त्यानंतर पोनि.पाटील यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यामधील ध्वनीमुद्रीत झालेले लाच मागणी संदर्भातील संभाशण ऐकले असता, त्यामध्ये माझेत व पोलीस हवालदार विलास देसाई यांचेत लाचेच्या मागणी संदर्भात झालेले संभाशण ध्वनिमुद्रीत झाले होते. माझे व पंच नं. 1 यांचे सांगणेवरून तसेच डिजीटल व्हाईस रेकार्डर मधील ऐकलेल्या ध्वनिमुद्रीत संभाशणावरुन आजरा पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार विलास देसाई यांनी माझेकडे माझी आई, मावशी, मामी व मामेभाझ यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करतो असे सं◌ागून 2500/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच आजरा पोलीस ठाणेस घेवून येण्यास सं◌ागितलेचे पोनि.पाटील व सोबतच्या स्टाफला त्यांनी केलेल्या पडताळणी मध्ये निश्पन्न झाले. त्यावेळी लागलीच सापळा कारवाई करणेची असलेने पडताळणीवेळी माझे व पोलीस हवालदार विलास देसाई यं◌ाचेत झालेल्या संभाषणाची सविस्तर स्क्रिप्ट सापळा कारवाईचे वेळी करणचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर पोनि.पाटील यांनी त्यांच्याकडील टाटा सुमो मध्ये बोलवून घेवून मला व पंचाना सापळापुर्व पंचनाम्याचे महत्व सांगून सापळापुर्व पंचनामा सूरु केला. त्यावेळी त्यांनी मला व पंचाना अल्ट्राव्हायोलेट दिवा व अंथ्◌्रा◌ासिन पावडरचे गुणधर्म व महत्व समजावून सांगितले. त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 5 चलनी नोटा असे एकुण रुपये 2500/- लाच रक्कम हजर केलेवर त्यांनी रक्कमेतील नोटांचे नंबर को-या कागदावर लिहुन तो कागद पंच नं. 2 सौ.घाटगे यांचेकडे दिला. त्यानंतर नोटांचे दोन्ही बाजूस सफौ.शाम बुचडे यांनी हाताच्या बोटाने अंथ्रासिन पावडर लावली आणि त्या चलनी नोटा माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवल्या. तसेच पोलीस हवालदार विलास देसाई यांनी लाच रक्कम मागणी करेपर्यंत त्यांना हात लावू नये, तसेच पोलीस हवालदार विलास देसाई यांनी लाच रक्कम स्विकारलेस माझे खिशामध्ये असलेला नपकिन डाव्या हाताने काढून चेहरा पुसत रहावे व तो हातामध्ये धरण्यास सांगितला म्हणजे पोलीस हवालदार विलास देसाई यांनी लाच रक्कम स्विकारलेचा तो इशारा समजण्यात येईल अशी सूचना दिली. त्यांनतर सापळा कारवाईच्या अनुशंगाने त्यांनी मला व पंच नं. 1 यांना सापळा कारवाईबाबत पुन्हा योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये नविन मेमरी कार्ड घातले आणि तो डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरु करुन तो माझ्या गळयात षर्टचे आतील बाजुस पिवळया धातुच्या चेनच्या सहायाने कोणास दिसणार नाही अशा रितीने चालू करुन अडकविला व मला व पंच नं. 1 भोळे यांना पोलीस हवालदार विलास देसाई यांची भेट घेण्यासाठी माझे कडील होंडा अक्टीव्हा वरून आजरा पोलीस ठाणेस 16.44 वा. पाठविले. मी आजरा पोलीस ठाणेस जावून पोलीस हवालदार विलास देसाई यांची पंच नं. 1 भोळे यांचेसोबत जावुन भेट घेतली असता, पोलीस हवालदार विलास देसाई यांनी आजरा पोलीस लाईन येथील रुम नं.2 मध्ये 2500/- रूपये लाचेची रक्कम मागणी केली. त्यावेळी मी ती लाच रक्कम माझे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिषातून उजव्या हाताने काढून पोलीस हवालदार विलास देसाई यांचे समोर धरली असता त्यांनी ती लाच रक्कम खोलीमध्ये असलेल्या काटवरील गादीवर ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी ती लाच रक्कम त्याठिकाणी ठेवली. त्यावेळी मी पोनि.पाटील यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे पोलीस हवालदार विलास देसाई यांनी लाच रक्कम स्विकारले◌ेचा रुमच्या बाहेर येवून मी माझे पन्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये असलेला नपकिन डाव्या हाताने काढून चेहरा पुसुन इशारा केलेवर, पोनि.पाटील व स्टाफ असे माझे जवळ आले. त्यावेळी पोनि.पाटील यांनी माझेजवळ येवून माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करुन आपल्या ताब्यात घेतला. त्यावेळी मी सांगितले प्रमाणे पोनि.पाटील व स्टाफ असे आजरा पोलीस लाईन रुम नं.2 मध्ये जावून पोलीस हवालदार विलास देसाई यांना पकडले. तसेच पोलीस हवालदार विलास देसाई यांनी स्विकारलेली लाच रक्कम रुपये 2500/- पंच साक्षीदारांचे समक्ष जप्त करुन ताब्यात घेतली. सदर कारवाईमध्ये पोलीस हवालदार विलास देसाई यांनी माझी आई, मावशी, मामी व मामेभाझ यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयाची कागदपत्रे कोठे ठेवली आहेत? याबाबत पोनि.पाटील यांनी विचारणा केली. त्यावेळी पोलीस हवालदार विलास देसाई यांनी ती सर्व कागदपत्रे सीसीटिएनएस मध्ये नां◌ेद करणेकरीता पोलीस ठाणेस दिली असल्याची सांगितले. त्याप्रमाणे पोनि.पाटील यांनी पंचाचे सोबत खात्री करुन तील सर्व कागदपत्रे आपल्या ताब्यात घेतली असून, आजरा पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार विलास शंकरराव देसाई यांनी आजरा पोलीस लाईन मधील रुम नं. 2 मध्ये माझेकडे माझी आई, मावशी, मामी व मामेभाझ यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करतो असे सं◌ागून 2500/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारली असता त्यांना अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडलेने त्यांचेविरुध्द माझी फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Balaji Tulashidas Bhange(I (Inspector)) / **or**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Desai

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Balaji Tulashidas Bhange

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
आजरा पोलीस ठाणे